RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक १३४(३)] सोमवार, सप्टेंबर २३, २०२४/आश्विन १, शके १९४६ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३५९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० सप्टेंबर, २०२४.

### आदेश

**महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९.**

क्रमांक एमपीआयडी-०११२३/प्र.क्र.७६/पोल-१५.— ज्याअर्थी, वैदेही मल्टीस्टेट अग्रो को.ऑपरेटीव्ह सोसायटी, जिल्हा सातारा (यापुढे "उक्त वित्तीय संस्था" असा उल्लेख करण्यात आला आहे) आणि सदर संस्थेचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि संस्थेचे कर्मचारी यांनी ठेवीदारांना मुदतीअंती लाभासह ठेवी परत करण्याचे आश्वासित करून ठेवी स्विकारल्या होत्या ;

आणि ज्याअर्थी, उक्त वित्तीय संस्था आणि सदर संस्थेचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि संस्थेचे कर्मचारी यांनी ठेवीदारांकडून स्वीकारलेल्या ठेवी मुदतपूर्तीनंतर ठेवीदारांना परत करण्यास कसूर केला असल्याने त्यांचेविरुद्ध फलटण पोलीस ठाणे, सातारा येथे गु.र.नं.४६७/२०२२आणि सातारा पोलीस स्टेशन येथे ६२७/२०२२ भारतीय दंड संहिता (सन १८६० चा ४५) कलम ४०६, ४०८, ४०९, ४२०, २०१, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० ब आणि ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (२००० चा महाराष्ट्र १६) कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, उक्त वित्तीय संस्था आणि सदर संस्थेचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि कोणतीही अन्य व्यक्ती हे ठेवीदारांच्या मागणीनुसार ठेवी परत करण्यात अपयशी ठरले असून उक्त वित्तीय संस्थांद्वारे ठेवीदारांना ठेवी परत करण्याची शक्यता दिसून येत नाही ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाला, उक्त वित्तीय संस्था आणि संस्थेचे संचालक, प्रवर्तक, भागीदार, व्यवस्थापक, सदस्य संस्थेचे कर्मचारी आणि संस्थेचे कर्मचारी आणि कोणतीही अन्य व्यक्ती यांनी जमा केलेल्या ठेवींमधून त्यांच्या स्वतःच्या अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावे रक्कम व अन्य मालमत्ता संपादित करण्यात आली असल्याचे अभिकथित असल्याने, उक्त वित्तीय संस्थांमधील ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्याकरिता अशी रक्कम व अन्य मालमत्ता जप्त करण्याचे आणि अशा जप्त रक्कम व अन्य मालमत्ता यावर नियंत्रण ठेवण्याकरिता उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी फलटण, जिल्हा सातारा यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करणे आवश्यक वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (२००० चा महाराष्ट्र १६) च्या कलम ४चे पोट-कलम (१) व कलम ५ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे—

(अ) अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वैदेही मल्टीस्टेट ॲग्रो को.ऑपरेटीव्ह सोसायटी या वित्तीय संस्था आणि सदर संस्थेचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि कर्मचारी कोणतीही अन्य व्यक्ती यांच्या नावे असलेली रक्कम व अन्य मालमत्ता जप्त करीत आहे ; आणि

(ब) सदर जप्त रक्कम व अन्य मालमत्ता यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी फलटण, जिल्हा सातारा यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

## अनुसूची

उक्त वित्तीय संस्था आणि सदर संस्थेचे अध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक, प्रवर्तक, भागीदार, सदस्य आणि कोणतीही अन्य व्यक्ती यांच्या जप्त करावयाच्या रक्कम व अन्य मालमत्तेची सूची खालीलप्रमाणे आहेः-

**(अ) स्थावर मालमत्तांचा तपशील :-**

| अ.क्र. | ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | मालमत्ता धारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | मनेगाव तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर. | खाते क्र. ८०५, गट सर्व्हे नं. ८५/१ पैकी ०.२३. हेक्टर आर चौरस मिटर. | वैदेही मल्टीस्टेट ॲग्रो को.ऑपरेटीव्ह सोसायटी, मॅनेजिंग डायरेक्टर सोमनाथ खंडु नेहे. |

**(ब) बँक खात्यांचा तपशील :-**

| अ.क्र. | खातेदाराचे नाव | बँकेचे नाव | खाते क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | वैदेही मल्टीस्टेट ॲग्रो सोसायटी, को.ऑपरेटीव्ह लिमिटेड | आयसीआयसीआय बँक | १८८९०१०००३३६ |
| २. | वैदेही मल्टीस्टेट ॲग्रो को.ऑपरेटीव्ह सोसायटी लिमिटेड | बँक ऑफ इंडिया | ०८२६२०११०००००६०६ |
| ३. | व्हि.व्हि.एस.एन. बँक मार्केटिंग प्रा.लि. | आयसीआयसीआय बँक | १८८९०५०००८४९ |
| ४. | सोमनाथ खंडु नेहे के.एफएस मल्टिसोल्युशन प्रा.लि. | आयसीआयसीआय बँक | १८८९०१५०२८९६ |
| ५. | सोमनाथ खंडु नेहे | देना बँक | ७६१३०२००००००७६५ |
| ६. | ज्ञानेश्वर तुकाराम गाढवे | आयडीबीआय बँक | ०६१४१०४०००१७४१९० |
| ७. | ज्ञानेश्वर तुकाराम गाढवे | बँक ऑफ बडोदा | ३७६१०१००००२८६५ |

**(क) जंगम मालमत्तेचा तपशील :-**

| अ.क्र. | मालमत्ताधारकाचे नाव | जप्त मालमत्तेचा तपशील | मूल्यांकन रुपयात |
|---|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर तुकाराम गाढवे | एक चारचाकी वाहन मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार एम.एच.११ सीजी ६२१४. | ४,२५,००० |

| अ.क्र. | मालमत्ताधारकाचे नाव | जप्त मालमत्तेचा तपशील | मूल्यांकन रुपयात |
|---|---|---|---|
| २. | वैदेही मल्टीस्टेट ॲग्रो को.ऑपरेटीव्ह सोसायटी तर्फे सोमनाथ खंडु नेहे. | बायोकेअर निर्मितीचे साहित्य (क्रुड इंधन व खत निर्मितीचा प्लांट). | ८०,३२,९०० |
| ३. | वैदेही मल्टीस्टेट ॲग्रो को.ऑपरेटीव्ह सोसायटी तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर सोमनाथ खंडु नेहे. | बायोडिझेल पंप | ५,६५,११८ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनुप कुमार सिंह,**
शासनाचे प्रधान सचिव (विशेष).

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 20th September, 2024.

### Order

MAHARASHTRA PROTECTION OF INTEREST OF DEPOSITORS (IN FINANCIAL ESTABLISHMENTS) ACT, 1999.

No.MPID-1123/C.R.No.76/Pol-15.— Whereas, Vaidehi Multistate Agro co-operative Society, District Satara (hereinafter referred to as "the said Financial Establishment"), and its Chairman, Directors, Manager, Promoters, Partners and its employee responsible for its management has received deposits from depositors under the scheme to repay the deposits on maturity alongwith benefits promised thereof to the depositors ;

And whereas, an offence has been registered against the said Financial Eestablishment and its Chairman, Directors, Manager, Promoters, Partners and its employee and other persons at Phaltan Police station, Satara *vide* Complaint Register No.467/2022 and Satara Police Station *p* Complaint Register No.627/2022 under sections 406, 408, 409, 420, 201, 465, 467, 468, 471, 120 B and 34 of the Indian Penal Code (45 of 1860) and section 3 of the Maharashtra Protection of Interest of Depositors (in Financial Establishments) Act, 1999 (Mah. XVI of 2000), that they have collected the deposits and have failed to repay the deposits after maturity ;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that the said Financial Establishment and its Chairman, Directors, Manager, Promoters, Partners,its employee and other persons have failed to repay the deposits on demand by the depositors and the said Financial Establishment is not likely to return the deposits to the depositors ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to attach the monies or other properties believed to have been acquired by the said Financial Establishment and its Chairman, Directors, Manager, Promoters, Partners,its Employee and other Persons, either in their own name or in the name of any other person from out of the deposits collected by the said Financial Establishment, in order to protect the interest of the depositors of the said Financial Establishment and to appoint Sub-Divisional Officer and Sub-Divisional Magistrate Phaltan, District Satara as the Competent Authority to exercise control over the monies and other properties attached.

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 and sub-section (*1*) of section 5 of the Maharashtra Protection of Interest of Depositors (in Financial Establishments) Act, 1999 (Mah. XVI of 2000), the Government of Maharashtra hereby,—

(*a*) attaches the monies and other properties Vaidehi Multistate Agro co-operative Society and its Chairman, Directors, Manager, Promoters, Partners,its employee and other persons, as specified in the *Schedule* appended hereto; and

(*b*) appoints Sub-Divisional Officer and Sub-Divisional Magistrate Phaltan, District Satara to be the Competent Authority to exercise control over the monies and other properties attached.

*Schedule*

The list of monies and other properties of the said Financial Establishment and their Promoters, Directors, Managers, Partners and Members or any other person to be attached are as follows, namely :—

*(A) Immovable Property Details :-*

| Sr. No. | Place | Property Details | Name of Owner |
|---|---|---|---|
| 1 | Manegao, Taluka Kopargaon, District Ahmednagar. | Account No. 805, Survey No. 85/1, 0.23 Hectares R. Sq. Meter. | Vaidehi Multistate Agro Co-Operative Society Limited Manager director Somnath Khandu Nehe. |

*( B ) Bank Accounts Details :—*

| Sr.No. | Name Of Account Holder | Name Of Bank | Account No. |
|---|---|---|---|
| 1. | Vaidehi Multistate Agro co-op Society Limited. | ICICI Bank | 188901000336 |
| 2. | Vaidehi Multistate Agro co-op Society Limited. | Bank of India | 082620110000606 |
| 3. | V.V.S.N. Agro Marketing Pvt. Ltd. | ICICI Bank | 188905000849 |
| 4. | Somnath Khandu Nehe | ICICI Bank | 188901502896 |
| 5. | Somnath Khandu Nehe<br>KSFS Multisoluitions Pvt.Ltd. | Dena Bank | 76130200000765 |
| 6. | Dyaneshwar Tukaram Gadhwe | I.D.B I Bank | 0614104000174190 |
| 7. | Dyaneshwar Tukaram Gadhwe | Bank of Badoda | 37610100002865 |

*(C) Movable Properties Details :—*

| Sr.No. | Name of Holder | Description of Seizured Properties | Valuation In Rs. |
|---|---|---|---|
| 1. | Dnyaneshwar Tukaram Gadhave | MH 11 CG 6214 One Maruti Suzuki Swift Dzire Car. | 4,25,000 |
| 2. | Vaidehi Multistate Agro co-opp Society Limited, Nashik Management Director Somnath Khandu Nehe. | Biocare Manufacturing Materials Manure Fuel and Fertilizer Manufacturing Plant. | 80,32,900 |
| 3. | Vaidehi Multistate Agro co-opp Society Limited Nashik Management Director Somnath Khandu Nehe. | Biodiesel Pump | 5,65,118 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANUP KUMAR SINGH,
Principal Secretary (Special) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.